| MHYA210028442017 | दाखल दिनांक : ०४/०९/२०१७<br>नोदंणी दिनांक : ०४/०९/२०१७<br>निकाल दिनांक : १२/०३/२०२६<br>**कालावधी : वर्ष महिने दिवस**<br>**०८ ०६ ०८** |
|---|---|

| | |
|---|---|
| | **वणी येथील न्यायदंडाधिकारी वर्ग–१, न्यायालय क्र.२ यांचे न्यायालयात**<br>**(पिठासीन अधिकारी – ए. बी. बिरादार)**<br>**–: न्यायनिर्णय :–**<br>**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.२१०७/२०१७, निशाणी क्र.१३६/ब**<br>**गु.र.नं.आय–५०२/२०१७ पोलीस ठाणे–वणी**<br>**ता.वणी जि.यवतमाळ.** |
| फिर्यादी | **महाराष्ट्र शासन तर्फे,**<br>पोलीस ठाणे वणी |
| अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता | **श्री.पी.एम.कन्नलवार** |
| आरोपी | **१. विश्वास रामचंद्र नांदेकर (मयत)**<br>**२. सुनिल महादेव कातकडे**<br>वय–४९ वर्षे,<br>रा.चिखलगांव, वणी ता.वणी जि.यवतमाळ<br>**३. संजय पुरुषोत्तम निखाडे**<br>वय–५३ वर्षे,<br>रा.शिंदोला, वणी ता.वणी जि.यवतमाळ<br>**४. टिकाराम मोतीराम खाडे**<br>वय–४५ वर्षे, |

| | |
|---|---|
| | रा.उकनी, वणी ता.वणी जि.यवतमाळ<br>**५. ललीत सुरेशराव लांजेवार(मयत)**<br>**६. प्रमोद मुरलीधर मिलमीले**<br>वय–४४ वर्षे,<br>रा.राजुर कॉलरी, वणी ता.वणी जि.यवतमाळ<br>**७. घनश्याम वासुदेव निखाडे**<br>वय–४७ वर्षे,<br>रा.चिखलगांव, वणी ता.वणी जि.यवतमाळ<br>**८. अमोल जयंत रांगनकर(मयत)**<br>**९. तेजराव आनंदराव बोढे**<br>वय–६२ वर्षे,<br>रा.गणेशपुर, वणी ता.वणी जि.यवतमाळ<br>**१०. परसराम सखाराम पेंदोर**<br>वय–६६ वर्षे,<br>रा.कुरई, वणी ता.वणी जि.यवतमाळ |
| आरोपीतर्फे विधिज्ञ | **आरोपी क्र.२ तर्फे श्री.कातकडे, आरोपी क्र.३, ४ व ७ तर्फे श्री.व्ही.व्ही.तेलतुमडे, आरोपी क्र.६ व ९ तर्फे श्री.डी.एन.लोडे आरोपी क्र.१० तर्फे श्री.बोरुले** |

**भाग –ब**

| | | |
|---|---|---|
| १. | प्रथम खबर दिनांक | ११/०५/२०१७ |
| २. | दोषारोप पत्राचा दिनांक | ०४/०९/२०१७ |
| ३. | दोषारोप ठेवल्याचा दिनांक | २०/०२/२०२६ |
| ४. | पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | २६/०२/२०२६ |
| ५. | न्यायनिर्णय राखून ठेवल्याचा दिनांक | १२/०३/२०२६ |
| ६. | न्यायनिर्णयाचा दिनांक | १२/०३/२०२६ |
| ७. | शिक्षा दिल्याची तारीख, आदेश | निर्दोष मुक्त. |

## आरोपीचा तपशील

| अ.क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनवर सोडल्याची तारीख | अधिनियम | निर्दोष मुक्त केले किंवा शिक्षा दिली | दिलेली शिक्षा | सुणावणीदरम्यान जेलमध्ये असल्याचा कालावधी कलम ४२८ सी. आर. पी. सी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सुनिल महादेव कातकडे | सुचनापत्रावरती सोडण्यात आले | २४/०९/१९ | १३५ मुंबई पोलीस अधिनीयम | निर्दोष मुक्त केले. | निरंक | निरंक |
| २. | संजय पुरुषोत्तम निखाडे | सुचनापत्रावरती सोडण्यात आले | २८/१०/२५ | १३५ मुंबई पोलीस अधिनीयम | निर्दोष मुक्त केले. | निरंक | निरंक |
| ३. | टिकाराम मोतीराम खाडे | सुचनापत्रावरती सोडण्यात आले | २३/०७/१९ | १३५ मुंबई पोलीस अधिनीयम | निर्दोष मुक्त केले. | निरंक | निरंक |
| ४. | प्रमोद मुरलीधर मिलमीले | सुचनापत्रावरती सोडण्यात आले | १९/०१/१८ | १३५ मुंबई पोलीस अधिनीयम | निर्दोष मुक्त केले. | निरंक | निरंक |
| ५. | घनश्याम वासुदेव निखाडे | सुचनापत्रावरती सोडण्यात आले | १६/१०/१८ | १३५ मुंबई पोलीस अधिनीयम | निर्दोष मुक्त केले. | निरंक | निरंक |
| ६. | तेजराव | सुचनापत्रावरती | ०५/०९/१८ | १३५ | निर्दोष | निरंक | निरंक |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | आनंदराव बोढे | सोडण्यात आले | | मुंबई पोलीस अधिनीयम | मुक्त केले. | | |
| ७. | परसराम सखाराम पेंदोर | सुचनापत्रावरती सोडण्यात आले | ०५/०९/१८ | १३५ मुंबई पोलीस अधिनीयम | निर्दोष मुक्त केले. | निरंक | निरंक |

**भाग–क**

**अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची यादी / बचाव / न्यायालयाचे साक्षीदार**

**अ. अभियोग**

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | प्रविण सुरेश आत्राम | घटनास्थळ पंच (निशाणी क्र.११९) |
| अ.सा.क्र.२ | अशोक मारुतराव काकडे | तपासी अधिकारी (निशाणी क्र.१२२) |
| अ.सा.क्र.३ | वसंता किसनराव चव्हाण | फिर्यादी (निशाणी क्र.१२५) |

**ब. बचाव साक्षीदार, इतर**

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| डि.सा.क्र.१ | निरंक | निरंक |

## क. कोर्ट साक्षीदार, इतर

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप<br>(प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| सी. सा.क्र.१ | निरंक | निरंक |

## अभियोगपक्षाचे / बचाव / कोर्ट निशाणी

## अ. अभियोग

| अनु. क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १. | १२७ | फिर्याद |
| २. | १२७ | छापील फिर्याद |
| ३. | १२३ | मुद्देमाल पावती |
| ४. | १२० | घटनास्थळ पंचनाम्यावरील सही |

## ब. बचाव

| अनु. क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

## क. कोर्ट निशाणी

| अनु. क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

## ड. मुद्देमाल

| अनु. क्र. | मुद्देमाल | तपशील |
|---|---|---|
| १. | नि.क्र.२३<br>माल क्र.१०४/२०१७ | एक कापडी रंगीत बॅनर लांबी १२७ सेमी रुंदी १०० सेमी ज्यावरती मध्यभागी रावसाहेब दानवे यांचे छायाचित्र |

## –: न्यायनिर्णय :–

## (घोषित दि.१२/०३/२०२६)

प्रस्तुत खटला हा आरोपींविरुध्द मुंबई पोलीस अधिनियम,१९५१ चे कलम १३५ अन्वये शिक्षापात्र असलेल्या गुन्ह्यासाठी चालविण्यात आला आहे.

**अभियोग पक्षाची खटल्याबाबतची कथने संक्षिप्तरित्या खालील प्रमाणे आहेः–**

०२. फिर्यादी हे वणी पोलीस स्टेशन येथे गोपनीय शाखेत पो.हे.कॉ. म्हणुन कार्यरत होते. त्यावेळी ते दि.११/०५/२०१७ रोजी ११.३० च्या दरम्यान टिळक चौक, वणी येथे राजकीय हालचाली संदर्भात गोपनीय माहिती संकलीत करीत होते. त्यावेळी आरोपी हे टिळक चौक येथे रावसाहेब दानवे भाजपा प्रदेशाध्यक्ष "शेतकऱ्यांनी रडके धंदे बंद करा, तुरीला भाव मागु नका, एक लाख टनाला खरेदी दिली आता, परवा तरी रडता साले" या वक्तव्याचे निषेधार्थ आरोपींनी रावसाहेब दानवे यांचे छायाचित्र असलेले बॅनर शिवाजी पुतळ्यासमोरील लोखंडी कथड्याला बांधुन बॅनरला चपलाचा हार घालुन रावसाहेब दानवेचे करायचे काय खालत मुंडक वरती पाय अशा घोषणा देत होते. त्यानंतर आरोपींनी मा.उपविभागीय अधिकारी वणी यांचे कार्यालयात जावुन निवेदन दिले. मा.पोलीस अधिक्षक, यवतमाळ यांचे पत्र क्र.२३२३/२०१७ दि.०८/०५/२०१७, गृह शाखा डेस्क–१२/१०६३/२०१७ दि.०९/०५/२०१७ अन्वये यवतमाळ जिल्ह्यात दि.१०/०५/२०१७ ते २४/०५/२०१७ पर्यंत प्रतिबंधीत आदेश लागु असतांना आरोपींनी प्रशासनाची कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता मोर्चा काढुन सदर आदेशाचे उल्लंघन केले. त्यामुळे आरोपींच्या कृत्यावरुन फिर्यादीने वणी पोलीस स्टेशन येथे फिर्याद दाखल केली. म्हणुन ही प्रस्तुतची फिर्याद.

०३. फिर्यादीच्या तक्रारीवरुन वणी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.५०२/२०१७ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला. गुन्हयाचा तपास पो.उप.निरीक्षक अशोक काकडे यांच्याकडे देण्यात आला. तपासादरम्यान त्यांना आरोपींविरोधात पुरेसा पुरावा मिळाल्यामुळे फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम १७३(२) प्रमाणे आरोपींविरुध्द वर नमुद गुन्हयाप्रमाणे न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले.

०४. आरोपी न्यायालयात हजर झाले. त्यानंतर नि.क्र.१०९ वरती आरोपींविरोधात मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम १३५ अन्वये आरोपींवर दोषारोप ठेवले. दोषारोप हे आरोपींस मराठी भाषेत वाचुन आणि समजावुन सांगण्यात आले. आरोपींनी त्यांच्यावरील दोषारोप नाकारले व संपरीक्षेची मागणी केली. अभियोग पक्षाने सादर केलेल्या पुराव्यामधुन आरोपींविरोधात सबळ पुरावा अभिलेखावर आल्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३(१)(ब) प्रमाणे आरोपींचा जबाब नि.क्र.१२९ ते १३५ नुसार नोदंविण्यात आला.

०५. ऊभय पक्षाच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. युक्तीवाद, अभिलेखावरील तोंडी व लेखी कागदोपत्री पुरावा लक्षात घेता, खालील मुद्दे माझ्या विचारात येतात, त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसहित मी पुढील प्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय की, आरोपींनी त्यांचे समान उद्देशाचे पुरस्नार्थ संगनमत करुन दि.११/०५/२०१७ | ... नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| | रोजी ११.३० वाजण्याच्या सुमारास टिळक चौक, वणी येथे जिल्हाधिकारी यवतमाळ यांचे कायदेशीर आदेशांचे किंवा नियमांचे उल्लंघन करुन आदेशाचा भंग केला व त्याद्वारे आरोपींनी मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम १३५ अन्वये शिक्षेसपात्र गुन्हा केला हे अभियोगपक्ष सिद्ध करतो का ? | |
| २. | काय आदेश ? | **...आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते.** |

## कारणमिमांसा

अभियोग पक्षाने नि.क्र.१२८ अन्वये पुरावा बंदची पुरशिस दिली. त्याद्वारे अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपींनी त्यांच्यातर्फे बचावासाठी कोणताही पुरावा दाखल केलेला नाही.

**मुद्दा क्र.१ साठी –**

**०६.** अभियोगपक्षाच्या कथनानुसार आरोपींनी मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम १३५ अन्वये गुन्हा केला आहे हे अभियोग पक्षाने सिद्ध करणे गरजेचे व आवश्यक आहे. अभियोग पक्षाने आरोपींविरुद्धचा गुऩ्हा सिद्ध करण्यासाठी फिर्यादीसह एकुण ०३ साक्षीदारांची साक्ष नोंदविली.

**०७.** प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्षास सिध्द करायचे होते की, आरोपींनी जिल्हाधिकारी यवतमाळ यांचे कायदेशीर आदेशाचे किंवा नियमांचे उल्लंघन करुन आदेशाचा भंग केला. सदर बाब सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने साक्षीदार क्र.३

फिर्यादी वसंता यांची साक्ष नि.क्र.१२५ वर नोंदवली. त्यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले आहे की, ते आरोपींना ओळखतात. तसेच ते सन २०११ ते जुलै २०१७ पर्यंत पोलीस स्टेशन वणी येथे कार्यरत होते. त्यावेळी दि.११/०५/२०१७ रोजी त्यांना वणी शहरामध्ये गोपनीय माहिती काढत असतांना आरोपी हे टिळक चौकामध्ये बेकायदेशिर जमाव करुन रावसाहेब दानवे भाजपा प्रदेशाध्यक्ष यांचा फोटो असलेल्या बॅनरला चपलाचा हार घालुन घोषणा देत असतांना दिसुन आले होते. त्यावेळी त्यांनी आरोपींना समजावुन सांगितले की, जिल्ह्यामध्ये जमाबंदीचे आदेश असल्यामुळे तुम्हाला जमाव करता येत नाही. त्यावेळी आरोपीं हे त्यांचे ऐकत नव्हते. तसेच आरोपींनी त्या ठिकाणी घोषणा देवुन बरेच लोक जमा केले होते. त्यानंतर त्यांनी आरोपी ऐकत नसल्यामुळे आरोपींविरोधात पोलीस स्टेशन येथे नि.क्र.१२६ व १२७ प्रमाणे फिर्याद दाखल केली होती. त्यांना सदरची फिर्याद व छापील फिर्याद दाखविली असता त्यांनी त्यावरील त्यांची सही ओळखुन त्यातील मजकुर बरोबर असल्याचे कथन केलेले आहे. तसेच रिपोर्ट दिल्यानंतर पोलीसांनी त्यांचे बयाण नोंदवले होते.

०८. आरोपींच्या वकिलांनी सदर साक्षीदारास ऊलटतपासादरम्यान प्रश्न विचारले असता सदर साक्षीदाराने उलटतपासात मान्य केले आहे की, ते घटनेच्यावेळी कॉन्स्टेबल म्हणुन कार्यरत होते व ते गोपनीय कर्मचारी म्हणुन काम करत होते. तसेच घटना ही अंदाजे ११.३० च्या दरम्यान घडली होती. तसेच त्यांनी पोलीसांना बयाण व फिर्याद देतेवेळेस त्यांनी आरोपींना समजावुन सांगितले की, जिल्ह्यामध्ये जमावबंदीचा

आदेश आहे, आपल्याला असे काम करता येत नाही, तरी सुद्धा ते ऐकत नव्हते, त्यामुळे त्यांनी त्यांच्या विरोधात फिर्याद दिली असे सांगितले होते. परंतु सदर बाबी या त्यांच्या बयाण व फिर्यादमध्ये का नमुद नाहीत याचे कारण त्यांना सांगता आलेले नाही.

**०९.** तसेच अभियोगपक्षाने सदर गुन्ह्यातील तपासी अधिकारी साक्षीदार क्र.२ काकडे यांची साक्ष नोंदवलेली आहे. त्यांनी त्यांच्या साक्षेत असे कथन केले आहे की, त्यांना दि.११/०५/२०१७ रोजी गुन्हा क्र.५०२/२०१७ चा कलम १३५ मुंबई पोलीस अधिनीयम या गुन्ह्याचा तपास मिळाला होता. तपासादरम्यान त्यांनी फिर्यादी व साक्षीदारांचे जबाब नोंदवले होते. तपासामध्ये त्यांनी बॅनर जप्त करुन घटनास्थळ पंचनामा तयार केला होता. त्यांना तो दाखविला असता त्यांनी त्यावरील त्यांची सही नाकारलेली आहे. त्यानंतर त्यांनी मुद्देमाल पोलीस स्टेशन येथे नि.क्र.१२३ वरील पावती प्रमाणे जमा केला. त्यावरती त्यांची सही आहे. त्यानंतर त्यांनी दोषारोपपत्र दाखल केले होते. तसेच आरोपींना सुचनापत्र देवुन सोडण्यात आले होते. आरोपींच्या वकिलांनी सदर साक्षीदारास ऊलटतपासादरम्यान प्रश्न विचारले असता सदर साक्षीदाराने उलटतपासात मान्य केले आहे की, ते वणी पोलीस स्टेशन येथे सन २०१५ ते सन २०१९ पर्यंत पी.एस.आय म्हणुन कार्यरत होते. सदर गुन्ह्याची माहिती त्यांना अंदाजे ११.३० ते १२ वाजेच्या दरम्यान मिळाली होती व त्यावेळी ते पोलीस स्टेशन येथे होते. तसेच त्यांनी घटनास्थळी भेट दिली नव्हती. तसेच सदर गुन्ह्याचा तपास त्यांना लेखी आदेशान्वये देण्यात आलेला होता. परंतु सदर आदेशाची प्रत त्यांनी

दोषारोपपत्रासोबत दाखल केली नाही. त्यानंतर त्यांनी कथन केले की, सदर आदेशाबाबतची नोंद ही स्टेशन डायरी येथे करण्यात आली होती. परंतु सदर स्टेशन डायरीची नोंद ही सुद्धा दोषारोपपत्रासोबत दाखल केली नाही.

१०. अभियोग पक्षाने घटनास्थळ पंचनामा सिद्ध करण्यासाठी घटनास्थळ पंच म्हणुन साक्षीदार क्र.१ प्रविण याची साक्ष नोंदवलेली आहे. त्याने त्याच्या साक्षेत असे कथन केले आहे की, तो फिर्यादी व आरोपींना ओळखत नाही. तसेच पोलीसांनी त्याला पोलीस ठाणे वणी येथे बोलाविले होते व तेथे त्याची सही घेतली होती. त्याला घटनास्थळ पंचनामा दाखविला असता त्याने त्यावरील त्याची सही ओळखली परंतु त्यातील मजकुर त्याला माहिती नसल्याचे त्याने कथन केले आहे. सदर साक्षीदाराने अभियोगपक्षास सहकार्य केले नसल्यामुळे अभियोग पक्षाने त्यास फितूर घोषित करुन त्यास उलटतपासाच्या स्वरुपात उत्तरसुचक प्रश्न विचारुन देखील त्याने अभियोग पक्षास सहकार्य होईल अशी कोणतीही बाब पटलावरती आणलेली नाही.

११. प्रस्तुत प्रकरणामध्ये विधीज्ञांचा युक्तीवाद व अभिलेखावर आलेल्या पुराव्यांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, आरोपींच्या वकिलांनी सदर प्रकरणामध्ये सा.क्र.३ वसंता व सा.क्र.२ काकडे हे दोन्ही पोलीस अधिकारी असल्यामुळे त्यांची साक्ष ग्राह्य धरता येणार नाही अशा पद्धतीचा युक्तिवाद केला. परंतु साक्षीदार हे केवळ पोलीस कर्मचारी आहेत म्हणुन त्यांची साक्ष नाकारता येणार नाही. परंतु त्यांच्या साक्षीचे बारकाईने अवलोकन करणे गरजेच आहे. अभिलेखावर आलेला

सा.क्र.३ वसंता यांनी त्यांच्या साक्षीमध्ये कथन केले आहे की, दि.११/०५/२०१७ रोजी ते वणी येथे कार्यरत असतांना टिळक चौकामध्ये आरोपी हे बेकायदेशिर जमाव जमवुन रावसाहेब दानवे भाजपा प्रदेशाध्यक्ष यांचा फोटो असलेल्या बॅनरला चपलांचा हार घालुन घोषणा देत असतांना दिसुन आले होते. त्यावेळी त्यांनी आरोपींना समजावुन सांगितले की, जिल्हामध्ये जमावबंदीचा आदेश आहे त्यामुळे तुम्हाला जमाव करता येणार नाही. परंतु आरोपींनी त्यांचे ऐकले नसल्यामुळे त्यांनी आरोपींविरोधात फिर्याद दाखल केली होती. तसेच सा.क्र.३ यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये त्यांनी आरोपींना समजावुन सांगितले की, जिल्ह्यामध्ये जमावबंदीचे आदेश आहेत आपल्याला असे काम करता येणार नाही तरी सुद्धा त्यांनी ऐकले नाही त्यामुळे त्यांनी फिर्याद दाखल केली. या बाबीमध्ये त्यांनी सुधारणा केल्याचे दिसुन येत आहे.

१२. तसेच या ठिकाणी प्रथमतः जिल्हाधिकारी यांचे जमावबंदीचे आदेश होते का ही बाब सिद्ध करणे अत्यंत आवश्यक आहे. परंतु अभिलेखाचे अवलोकन केले असता या ठिकाणी कुठलाही जिल्हाधिकारी यांचा आदेश अभिलेखावरती आल्याचे दिसुन येत नाही. तसेच तपासी अधिकारी यांनी सुद्धा त्याबाबत कुठलेही कथन केल्याचे दिसुन येत नाही. तसेच या ठिकाणी अभियोगपक्षाच्या कथनाप्रमाणे आरोपी हे रावसाहेब दानवे यांचा फोटो असलेल्या बॅनरला चपलाचा हार घालुन घोषणा देत होते व सदरचा बॅनर जप्त केला होता याबाबतचे कथन अभियोगपक्ष करत असला तरी अभियोयगपक्षाचा सा.क्र.१ प्रविण याने त्याच्या समक्ष कुठलीही घटनास्थळ व जप्तीची कार्यवाही झाली

नसल्याचे कथन केले आहे. तसेच तपासी अधिकारी काकडे यांनी सुद्धा त्यांच्या उलटतपासामध्ये मान्य केले आहे की, ते घटनास्थळी गेले नाहीत. त्यामुळे सदरची घटनास्थळाची कार्यवाही ही घटनास्थळी केली का याबाबत संशय निर्माण होत आहे. त्यामुळे एकंदर अभिलेखावर आलेला पुरावा हा आरोपीं वरील आरोप हे संशयाच्या पलीकडे जावुन शाबीत होत नाही. अभिलेखावर आलेला एकंदरीत पुरावा हा अभियोगपक्षाच्या कथनास पुरेसे सहकार्य करत नसल्यामुळे तसेच साक्षीदारांच्या साक्षेमध्ये विसंगती आढळुन येत असल्यामुळे आरोपींविरुद्ध गुन्हा संशयाच्यापलीकडे जावुन सिद्ध होत नाही. कारण की, फौजदारी न्यायशास्त्रानुसार आरोपींविरुध्द लावण्यात आलेले दोषारोप सर्व संशयाच्या पलीकडे जाऊन शाबीत करण्याची सर्वस्वी जबाबदारी ही अभियोग पक्षावर असते. आरोपींविरुध्द गुन्हा शाबीत करणेसाठी सादर केलेल्या पुराव्याच्या साखळीच्या सर्व कड्या एकमेकांमध्ये घट्टपणे गुंफलेल्या असणे आवश्यक आहे. तसेच पुराव्याच्या साखळीतील एखादी कडी कमकुवत असल्यास अभियोगपक्षाच्या केसला मारक ठरु शकते. याउलट आरोपींनी घेतलेला बचाव सर्व संशयाच्या पलीकडे जाऊन शाबीत करणे आवश्यक नाही. त्यांनी केवळ बचावातील संभाव्यता दाखविली तरी पुरेसे आहे. सदर प्रकरणात घटना घडलेबाबत ठोस सुसंगत व परस्पपुष्टीदायक पुरावा मिळालेला नसुन, परस्परविसंगत कबुली दिलेल्या आहेत. त्यामुळे आरोपींवरील आरोप संशयाच्या पलीकडे जावून सिध्द होवू शकले नाही. सबब, आलेल्या ऊपरोक्त अपुऱ्या व संशयास्पद पुराव्यावरुन आरोपींवरील तथाकथीत आरोप संशयापलीकडे जावून सिध्द होऊ शकले नाही. त्यामुळे अभिलेखावर आलेला पुरावा

हा आरोपींनी जिल्हाधिकारी यवतमाळ यांचे कायदेशीर आदेशाचे किंवा नियमांचे उल्लंघन करुन आदेशाचा भंग केला याबाबतचा ठोस असा पुरावा अभिलेखावर आलेला नसल्यामुळे आरोपींनी मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम १३५ प्रमाणे अपराध केल्याची ऊपरोक्त अपुऱ्या व संशयास्पद पुराव्यावरुन आरोपींवरील तथाकथीत आरोप संशयापलीकडे जावून सिध्द होऊ शकले नाही. म्हणून मुद्दा क्र.१ चे ऊत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.२ बाबतः–</u>**

**१३.** वरील मुद्दयास नकारार्थी उत्तर दिल्यामुळे आरोपींवर लावण्यात आलेल्या दोषारोपातुन त्यास निर्दोष मुक्त करण्याच्या निर्णयापर्यंत मी आलो आहे. आरोपी हे जामीनावर मुक्त असल्यामुळे फौजदारी प्रकीया संहिता कलम ४३७ (अ) प्रमाणे निकालानंतर पुढील ०६ महिन्यांसाठी आरोपींस जामिनदार देणे गरजेचे आहे. सबब, मुद्दा क्र.२ करीता मी खालील आदेश पारीत करत आहे.

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| १. | आरोपी क्र.२, ३, ४, ६, ७, ९ व १० यांना **१९७३ चे कलम २४८(१)** प्रमाणे **मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम १३५** अन्वयेच्या गुन्हयातुन निर्दोष मुक्त करण्यात येते. |
| २. | आरोपींचे वैयक्तीक व जामीनदाराचे जातमुचलके रद्द करण्यात येतात. |
| ३. | **फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७(अ)** अन्वये आरोपींनी प्रत्येकी **रक्कम १५,०००/–** रुपयांचा वैयक्तीक जातमुचलका द्यावा व सदरचा |

| | |
|---|---|
| | जाचमुचलका हा **फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ)** अन्वये पुढील सहा महिन्याकरीता अस्तीत्वात राहील. |
| ४. | गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल **एक कापडी रंगीत बॅनर लांबी १२७ सेमी रुंदी १०० सेमी ज्यावरती मध्यभागी रावसाहेब दानवे यांचे छायाचित्र** हे मुल्यहीन असल्यामुळे अपील कालावधीनंतर योग्य ती विल्हेवाट लावण्यात यावी. |
| ५. | न्यायानिर्णय हा खुल्या न्यायालयात **फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम ३५३ (१)(क)** प्रमाणे घोषीत करण्यात आला. |

BIRADAR AMOL BALAJI

Digitally signed by BIRADAR AMOL BALAJI
Date: 2026.03.13 16:08:52 +0530

**( ए. बी. बिरादार )**

दि.१२/०३/२०२६

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,वणी.

(न्यायालय क्र.२)

**Certificate**

I affirm that the contents of this PDF file Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | G.J.Bhadke |
| Name of Court | : | 2nd Jt.Civil Judge Junior Division, Wani. |